# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ०१/१०/२०२४

## प्रेसनोट

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय (moHUA), भारत सरकार यांनी दिलेल्या निर्देशानुसार "स्वछता ही सेवा 2024" स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता यामध्ये मा. प्रशासक तथा आयुक्त श्री विकास ढाकणे यांच्या आदेशानुसार, व मा. अतिरीक्त आयुक्त डॉ. किशोर गवस मा. अतिरीक्त आयुक्त श्री. लेंगरेकर यांच्या मार्गदर्शना नुसार, दिनांक ३०/०९/२०२४ रोजी कल्याण अंबरनाथ रोड येथे उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने व विविध स्वयंसेवी संस्था यांच्या सहभागाने सकाळी ०९.३० ते ११.०० वाजे पर्यत मेगा स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या अभियानाची सुरुवात श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज चौक, उल्हासनगर येथून झाली. सदर अभियानाकरता २ गट बनविण्यात आले. नंतर एक गट फालवर लाईन कडे गेला व एक गट शांतीनगर वेलकम गेट कडे गेला. या अभियानादरम्यान सदर रोड ची व रस्ते दुभाजकाची साफ सफाई करण्यात आली.

सदर कार्यक्रमासाठी उल्हासनगर शहराचे आमदार श्री कुमार आयलानी, अतिरीक्त आयुक्त डॉ. किशोर गवस, अतिरिक्त आयुक्त श्री जमीर लेंगरेकर, सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी श्री मनीष हिवरे, मुख्य बाजार निरीक्षक श्री विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री एकनाथ पवार, महापालिकेच्या इतर विभागाचे विभागप्रमुख, सर्व स्वच्छता निरीक्षक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधी, विविध कॉलेजेस जसे आर. के. टी, वेदांता, सेवा सदन, एसएचएम यांचे NSS चे विद्यार्थी, शिक्षक व स्वयंसेवी संस्था यांनी सहभाग घेतला. सदर वेळी स्वच्छता मुकादम व कर्मचारी असे जवळपास ८०० जण उपस्थित होते.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
३) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
४) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.